दिनांक २२/०८/२०२४

# -: प्रेस नोट :-

सन २०२२-२०२३ या वर्षातील रिक्त पदांची भरती करण्याकरीता राज्य शासनाने मंजूरी दिल्यानंतर पोलीस भरतीची जाहिरात दिनांक ०५/०३/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली. पोलीस शिपाई - ९.५९५ पदे. चालक पोलीस शिपाई - १.६८६ पदे. बॅण्डस्मन -४१ पदे, सशस्त्र पोलीस शिपाई- ४.३४९ पदे. कारागृह शिपाई - १.८०० पदे असे एकुण १७.४७१ पदे भरण्याकरीता जाहिरात देण्यात आली होती. त्यासाठी एकुण १६,८८,७८५ इतक्या उमेदवारांचे आवेदन अर्ज प्राप्त झाले होते. दिनांक १९/६/२०२४ पासून सर्व घटकांमध्ये मैदानी चाचणी, कौशल्य चाचणी व नंतर लेखी परीक्षा घेणेबाबतची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे

- पोलीस शिपाई पदाचे एकुण ९,५९५ रिक्त पदांकरिता एकुण ४६ जिल्हा / आयुक्तालयामध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात येत असून त्यापैकी ४५ जिल्हा व आयुक्तालयामध्ये प्रक्रिया पूर्ण झाली आहे व निवडपात्र ७,०२३ उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्याची प्रक्रिया सुरु आहे. फक्त मुंबई शहरची मैदानी चाचणी सुरु आहे.

- चालक पोलीस शिपाई पदाचे एकुण १,६८६ पदांकरिता एकुण २६ जिल्हा व आयुक्तालयामध्ये भरती प्रक्रिया राबविण्यांत येत असून त्यापैकी २४ जिल्हा व आयुक्तालयामध्ये भरती प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. मुंबई शहर व पुणे शहर येथील प्रक्रिया सुरु आहे.

- बॅण्डस्मन पोलीस शिपाई यांची एकूण ४१ पदांकरिता एकुण १४ जिल्हा व आयुक्तालयात भरती प्रक्रिया राबविण्यांत येत असून त्यापैकी १३ जिल्हा व आयुक्तालयामध्ये भरती प्रक्रिया पूर्ण झाली असून १७ उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्याची प्रक्रिया सुरु आहे. मुंबई शहरची प्रक्रिया सुरु आहे.

- राज्य राखीव पोलीस बलाच्या १९ गटामध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात आली असून सर्व टिकाणी ४,३४९ निवडपात्र उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

- कारागृह शिपाई यांची १,८०० पदांकरिता ४ घटकांमध्ये भरती प्रक्रिया सुरु आहे.

अशाप्रकारे एकूण १७,४७१ रिक्त पदांपैकी ११,९५६ पदांची निवड प्रक्रिया पूर्ण झाली असून त्यांना नियुक्तीपत्रे देणे सुरु आहे व निवडपात्र उमेदवार जिल्हा मुख्यालयात लवकर कर्तव्यार्थ हजर होतील.

या ११,९५६ निवड झालेल्या उमेदवारांमध्ये खुल्या प्रवर्गातील- २,८९०, आर्थिक दुर्बल घटक- १,१३२, एसईबीसी-१,०९७, इमाव-२,५४२, विमाप्र-२९३, भज-ड-२४५, भज-क-४४५, भज-ब-३३४, विजा-अ-३४४, अज-१,०९८, अजा-१,५३९ याप्रमाणे समावेश आहे.

या सर्व निवडपात्र उमेदवारांना माहे सप्टेंबर - २०२४ अखेरपर्यंत मुलभूत प्रशिक्षणाकरिता पार्टावण्यांत येणार आहे.

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व
खास पथके, म.रा., मुंबई

Scanned with CamScanner